**योजना :- जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत ग्रामपंचायतीला जनसुविधेसाठी विशेष अनुदान.**

**प्रस्तावना :-**शासन निर्णय क्रमांक/ददभु २०१०/प्रक्र ६२/पंरा-६, दिनांक १६.०९.२०१० नुसार मार्गदर्शक सुचना प्राप्त असुन जिल्हा स्तरीय योजना राबविण्याच्या निर्णय शासनाने घेतलेला आहे. जिल्हा नियोजन समितीच्या मागणीच्या अनुषंगाने नियोजन विभागामार्फत जिल्हा योजने अंतर्गत निधीत नियमीत उपलब्ध होईल.

**योजने अंतर्गत घ्यावयाची कामे :-**

**अ) ग्रामिण भागात दहन / दफन भुमीची व्यवस्था करणे त्या सुस्थितीत ठेवणे व त्यांचे नियमन करणे यासाठी स्मशानभुमीवर हाती घ्यावयाची कामे.**

१) दहन / दफन भुसंपादन
२) चबुतऱ्याचे बांधकाम
३) शेडचे बांधकाम
४) पोहोच रस्ता
५) गरजे नुसार कुंपन व भिंती घालुन जागेची सुरक्षितता साधने.
६) दहन / दफन भुमीत विद्युतीकरण व आवश्यकतेनुसार विद्युतदाहीनी/सुधारीत शवदाहीनी व्यवस्था.
७) पाण्याची सोय
८) स्मृती उद्यान
९) स्मशानघाट / नदीघाट बांधकाम (स्मशान व्यवस्थेसाठी आवश्यक तेवढे)
१०) जमीन सपाटी करण व तळ फरशी

**ब) ग्रामपंचायत भवन / कार्यालय या बाबत हाती घ्यावयाची कामे.**

१) नविन ग्रामपचांयत इमारत बांधकाम व इमारती अंतर्गत सुविधा यास प्राधान्य.
२) जुन्या ग्रामपचांयत इमारतीची पुर्नबांधणी / विस्तार.
३) ग्रामपंचायतीच्या आवारामध्ये वृक्षारोपन व परिसर सुधारणा, परिसराला कुंपण घालणे व इतर अनुषंगीक कामे. तसेच केंद्र पुरस्कृत म.ग्रा.रो.ह.यो. राजिव गांधी भवन.

तसेच शासन शुध्दीपत्रक दिनांक १३.३.२०१३ नुसार

**४) राष्ट्रीय ग्राम स्वराज योजना (RGSY) व राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान हि केंद्र पुरस्कुत (७५:२५)** योजना असल्याने या योजनेच्या माध्यमातुन हाती घेतलेले ग्रामपंचायत इमारत बांधकाम पुर्ण करण्यासाठी २५% निधी सदर योजनेतुन वापरता येईल.

ग्रामपचांयत कार्यालय नमुना नकाशा (Type Desigen) शासन निर्णय क्रमांक /वैविम २००२/प्रक्र ७६६/यो-७, दिनांक ०८.०८.२००७ नुसार संलग्न आहे. तसेच म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत प्राप्त भारत निर्माण राजिव गांधी सेवा केंद्राचा (Type Plane) नुसार कामे घेण्यात येतील

एका गावाकरीता अ व ब या योजनेसाठी प्रत्येकी जास्तीत जास्त रुपये १० लाख मंजुर करता येतील आवश्यकता भासल्यास जास्तीचा खर्च ग्रामपंचायतीने स्वनिधीतुन करावा.

## कामांना मंजुरी

१) सदर योजनेअंतर्गत हाती घ्यावयाच्या कामांचा समावेश गांव नियोजन आराखडयात असणे आवश्यक आहे.
२) या योजनेअंतर्गत प्रत्येक कामास प्रशासकीय मान्यता ग्रामसभेच्या सहमतीनंतर ग्रामपंचायत देईल.
३) योजनेतंर्गत कामास तांत्रिक मान्यता प्राप्त शासन निर्णय क्र. झेडपीए २००८/ प्र.क्र. ४४४/ वित्त - ९, दि.१५.०७.२००८ नुसार सक्षम अधिकारी-या मार्फत देण्यात यावी.
४) सदर योजनेतंर्गत कामाची निवड जिल्हा नियोजन समिती मार्फत करण्यात येईल.
५) योजनेचे आढावा व सनियंत्र अधिकारी हे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद राहतील.

## योजना :- जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत मोठया ग्रामपंचायतीला जनसुविधेसाठी विशेष अनुदान

**प्रस्तावना :-**शासन निर्णय क्रमांक/व्हिपीएम २६१०/प्रक्र १२९/पंरा-४, दिनांक १६.०९.२०१० नुसार मार्गदर्शक सुचना प्राप्त असुन जिल्हा स्तरीय योजना राबविण्याच्या निर्णय शासनाने घेतलेला आहे.सदर योजना ही ज्या ग्रामपंचायत ची लोकसंख्या ५००० च्या वर आहे. अशा ग्रामपंचयात चा नियोजन बध्द विकास करुन या गावांना विकास केंद्र म्हणुन विकासीत करताना ग्रामविकास व प्रर्यावरण विकास आराखडा तयार करुन त्याच्या अमलबंजावणी साठी तसेच खालील अतिरीक्त सुविधा या योजने अर्तगत देणे आवश्यक आहे. जिल्हा नियोजन समितीच्या मागणीच्या अनुषंगाने नियोजन विभागामार्फत जिल्हा योजने अंतर्गत निधीत नियमीत उपलब्ध होईल.

**<u>योजने अंतर्गत घ्यावयाची कामे :-</u>**

**१.१ नियोजन बध्द विकास**

ग्रामविकास आराखडा व पर्यावरण विकास आराखडा तयार करणे , यासाठी त सेवा उपलब्ध करुन घेणे , सदर विकास आराखडा तयार झाल्यावर व सक्षम प्राधिका-यांची मान्यता प्राप्त केल्यावर त्यामधील विविध सार्वजनिक सुविधांसाठी जागा संपादित करणे किंवा विकत घेणे. त्या सुविधेचा सुनियोजन विकास करणे , यासाठी तात्पुरते प्रकल्प निगडीत प्रशासकिय व तात्रिंक पाठबळ उपलब्ध करुन घेणे , यासाठी आवश्यक असणारा निधी या योजनेतुन देण्यात येईल.

**१.२ बाजार पेठ विकास :-**

ग्रामपंचायत मध्ये बाजारपेठांचे नियोजन व बांधकाम करणे , त्यासाठी जागा अधिग्रहीत करणे / विकत घेणे त्यांचा विकास करणे , विक्रेत्यांसाठी बाजार कट्टयाचे बांधकाम करणे , दिवाबत्तीची , पिण्याचे पाणी , इत्यादी

**१.३ सार्वजनिक दिवाबत्तीची सोय :-**

ग्रामपंचायतीना अपारंपारीक उर्जा वापराच्या दिव्यासाठी (सौरदिवे , एल ई डी दिवे ) , वायरींग व त्या अनुषंगीक खर्चासाठी हे अनुदान वापरण्यात यावे.

**१.४ बागबगीचे , उद्याने तयार करणे :-**

बागबगीचे , उद्याने चौकाचे सुशोभिकरण करण्यासाठी या योजनेतुन अनुदान देण्यात यावे.

**१.५ अभ्यास केंद्र :-**

मोठया गावातील विद्यार्थ्याना अभ्यास केंद्र बांधकाम करणे , टेबल व खुर्च्याची व्यवस्था करणे , दिवाबत्तीची व्यवस्था करणे इत्यादी सुविधा पुरविता येतील .

**१.६ गावाअंतर्गत रस्ते करणे**

**१.७ सांडपाणी व्यवस्थापनासाठी भुमीगत गटारे**

**१.८ ग्रामसचिवालय**

**१.९ छोटया ओटयावर घाट / साकण बांधणे**

यासाठी या योजनेतुन अनुदान देण्यात येणार आहे.

## १. निधी उपलब्धता :-

२.१ या कामासाठी प्रत्येक मोठया ग्रामपंचायतीला प्रथम ग्रामविकास आराखडा व पर्यावरण विकास आराखडा तयार करणेसाठी निधी या योजनेतुन देण्यात यावा. या प्रस्तावास मुख्यकार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद यांची मान्यता घेण्यात यावी . व त्यानंतर निधी उपलब्ध करुन देण्यात यावा . हा निधी कमाल दहा लाखाप्रर्यंत देण्यात यावा . त्यापेक्षा जास्त लागणारा निधी ग्रा.पं. स्वनिधी तुन खर्च करावा लागेल.

२.२ परिच्छेद क्र १.१ मध्ये नमुद केल्याप्रमाणे शासकिय जागांशिवाय इतर खाजगी जमिनी बाजारभावाने खरेदी करणे , किंवा संपादित करण्यासाठी एकुण रक्कमेच्या ७५ % रक्कम , परंतु कमाल २५ लाखाप्रर्यंन्त उपलब्ध करुन देण्यात यावा.

२.३ परिच्छेद क्र. १.२ ते १.५ मधील कामांसाठी १० % निधी ग्रा.पं.तींना स्वनिधी किंवा इतर स्त्रोंतातुन उभारावा. उर्वरित , ९० % निधी या योजनेतुन उपलब्ध करुन देण्यात यावा. मात्र क्र. १.२ (बाजारपेठ विकास ) करीता शासन निधीची कमाल मर्यादा २५ लाख , क्र १.३ (सा. दिवाबती ) करीता रुपये १० लाख , क्र. १.४ (बागबगीचे , उद्याने) रुपये १५ लाख १.५ अभ्यास केंद्र /वाचनालय/ ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र बांधणे करीता रुपये ७ लाख राहील १.६ गावांअतर्गत रस्ते करणे १.७ सांडपाणी व्यवस्थापनासाठी भुमीगत नाल्यांचे बाधकाम करणे १.८ ग्रामसचिवालय १.९ छोटया ओढयावर घाट/ साकव बांधणे एका वर्षात कोणत्याही ग्रामपंचायतीला सर्व कामांसाठी रुपये ५० लाख व पाच वर्षाच्या प्रकल्प काळात २ कोटी पेक्षा जास्त देता येणार नाही. उपलब्ध निधीचा विचार करून जिल्हयातील ग्रामपंचायतीचा प्राधान्यक्रम ठरविण्याचा अधिकार जिल्हा नियोजन मंडळाकडे असेल. मात्र ज्या गामपंचायती पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजनेत सहभागी होवून त्या योजनेच्या निकषाची पुर्तता केली असेल त्यामधूनच जिल्हा नियोजन मंडळ प्राधान्यक्रम ठरवील.

## अंमलबजावणीः-

१. **प्रशासकीय मान्यता** - या योजनेसाठी ग्रामपंचायतीने आराखडा तयार करून त्यास ग्रामसभेची प्रशासकीय मान्यता घ्यावी. त्यानंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची या प्रस्तावास मान्यता घ्यावयाची आहे.

**२. तांत्रिक मान्यताः-** ग्रामपंचायतीनी तयार केलेल्या आराखडयास कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद यांची तांत्रिक मान्यता घ्यावी.